MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

कृष्णा पानसंबळ चंद्रकांत बोराडे मोठ्या मोठ्या गुत्तेदार कंट्रक्शन चे पाठीराखे कोट्यावधी रुपयाची गुत्तेदारी आणि त्यातून मिळणारी टक्केवारी ही स्वर्गीय संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मराठा समाजाच्या मूक मोर्चा २८ डिसेंबर रोजी झालेल्या आंदोलनाला आर्थिक पाठबळ देणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कृष्णा पानसंबळ चंद्रकात बोराडे यांना राजकीय वरदहस्त लाभलेला आहे कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार याच पान संबळ बोराडे यांनी केलेला आहे भ्रष्टाचार हा बाहेर येणे गरजेचे आहे. पानसबळ बोराडेंचा कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार हा आता महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्या समोर जनता आणणार आहे आर्थिक रसत धनंजय मुंडे पंकजा मुंडे यांच्या विरोधात आंदोलन मोर्चाला पुरविणारे हे दोन बडे सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी मासे आहेत यांच्यासह अनेक बडे दिग्गज नेते व गुत्तेदार हे पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांच्या विरोधामध्ये मोठ मोठे गुत्तेदार कोण आहेत हेही समोर येणार आहे. बीड जिल्ह्यात वंजारी समाजात चांगल्या पदावरती अधिकारी आहेत तर मोठे मोठे गुत्तेदार ही वंजारी समाजात आहेत मराठा वंजारा वादामध्ये आता अधिकारी गुत्तेदार यांचेही नाव चर्चेत येऊ लागले आहे. परंतु विद्यमान मंत्री पंकजा मुंडे धनंजय मुंडे चे विरोधामध्ये आम्ही आर्थिक रसद पुरवली आहे २८ डिसेंबर रोजी च्या मोर्चाला असे दारूच्या नशेमध्ये बोलणाऱ्या चंद्रकांत बोराडे वर कारवाई होईल का बोराडे चा कोठ्यावधी रुपयाचा घोटाळा बाहेर निघणार आहे. त्यामुळे आता मराठा वंजारा वादाला आता अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये सुद्धा जात पाहून बीड जिल्ह्यातील शासन दरबारी पद मिळणार असल्याचे बोलले जात आहे. तर वंजारी समाजाच्या अधिकाऱ्यांना बीड जिल्ह्याच्या बाहेर पाठविण्यासाठी मराठ्याच्या अधिकाऱ्यांनी व गुत्तेदारांनी आता कंबर कसली आहे असंच बीड शहरामध्ये नागरिकांच्या तोंडून चर्चेला उधान येत आहे तर चंद्रकांत बोराडे हा दारूच्या नशेत बीडच्या शासकीय विश्रामगृहांमध्ये एका दारूच्या पार्टी दरम्यान रात्रीच्या वेळेस पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांचे विरोधामध्ये आम्ही आर्थिक रसात पुरवली आहे मी आणि पान संबळ सूर्योदय आणि संदीप क्षीरसागर अशी आमची जोडी असणार आहे आणि सोबतीला राजेंद्र मस्के असणार आहेत असंही बोराडे च्या तोंडून चर्चा ऐकायला मिळालेली आहे तर नागरिकांमध्ये मात्र आता याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त होत आहे बीड जिल्ह्यामध्ये जातीचा विष कुठेतरी कमी होणे हे भावना जनतेच्या मनात ऐकायला मिळत आहेत तर पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांच्या विरोधात जर अधिकारी आर्थिक रसात करून जर मोर्चे आंदोलनाला पार बजेत असतील तर नागरिकांमध्ये याचे तीव्र संताप व्यक्त होत आहे?

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१३३ | मंगळवार दि.२८ जानेवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -133 | TUESDAY DT.28 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4


# भ्रष्टाचाराच्या काळ्या पैशाची रसद २८ डिसेंबरच्या मोर्चाला बोराडे, पानसंबळाने पुरवल्याची चर्चा?

## दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ ! स्वतःचे पाप झाकण्यासाठी समाजाचा आधार घेण्याचा दोघांचेही प्रयत्न!

### दोन्ही मुंडेंच्या विरोधात मराठा बोराडे, पानसंबळसह गुत्तेदारांना पुढे करण्याचा आ.सुरेश धस, आ.संदीप क्षीरसागराचां प्रयत्न!






### बीडच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील दिग्गज अधिकारी भ्रष्टाचारात असलेले वादग्रस्त व राजकीय वरदहस्त लाभलेले

- **सार्वजनिक बांधकाम विभाग बीड मधून रवींद्र तोंडेला हटविण्याची केली चंद्रकांत बोराडे कृष्णा पानसंबळाची आज. सुरेश धस संदीप क्षीरसागर कडे मागणी?**
- **जर वंजाऱ्याचे अधिकारी पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांना आर्थिक पाठबळ देऊन अंधारातून प्रचार यंत्रणा हलवत असतील तर आम्हीही पंकजा मुंडे धनंजय मुंडे चे विरोधात मराठा दिग्गज नेत्यांना पाठबळ देऊ चंद्रकांत बोराडे कृष्णा पानसंबळ सह**
- **दिग्गज कंट्रक्शन चे गुत्तेदार आर्थिक पाठबळ देण्यासाठी सरसावले? बीड शहरातील नगर रोडवरील नामांकित डॉक्टरच्या जुन्या घरी बैठक कोट्यावधीच्या गुत्तेदारीची बोराडे पानसंबळनी टक्केवारी २८ डिसेंबर रोजी झालेल्या मोर्चाला केली दान नागरिकांत चर्चा ?**
- **मराठ्याचे अधिकारी आता वंजाऱ्याच्या अधिकाऱ्यांना बीड जिल्ह्याच्या बाहेर हाकलण्यासाठी नवी शकंल लढवू लागले?**
- **मराठा वंजारी वाद महाराष्ट्रात सर्वात जास्त बीड जिल्ह्यामध्ये का?**
- **कृष्णा पानसंबळ चंद्रकांत बोराडे हे सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्वात जास्त भ्रष्ट अधिकारी?**
- **धनंजय मुंडे पंकजा मुंडे यांच्या विरोधात मराठा समाजातील दिग्गज अधिकारी व गुत्तेदार आर्थिक रसद पूरवू लागले**

बीड प्रतिनिधी - बीड जिल्ह्यामध्ये जातीच्या विष अनेकांनी पेरलं आहे हे विष मोठ्या प्रमाणात पसरत असतानाच मात्र आता बीड जिल्ह्यात एक नवीन वादाला बीड जिल्ह्यामध्ये अनेक विभागांमध्ये मोठ्या मोठ्या पदावरती वंजारी समाजातील अधिकारी आहेत या वंजारी समाजातील अधिकारी हे पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांची वरदहस्त लाभलेले आहेत असा अनेक नेते मंडळींनी आरोप राजकीय वर्तुळामध्ये काही दिवसांपूर्वी केलेला आहे राजकीय नेत्यांची वंजारी समाजातील अधिकारी कर्मचारी गुत्तेदार यांची यादीत विरोधकांनी यावेळी सोशल मीडिया वर व्हायरल केली महाराष्ट्रामध्ये अनेक नेते मंडळी विरोधी बाकावर विरोधकांनी यावेळी बीड जिल्ह्यातील अधिकारी कर्मचारी यांना वरदहस्त पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांचा आहे असे स्पष्ट सांगितला आहे

पंकजा मुंडे धनंजय मुंडे हे दोन्हीही महाराष्ट्राच्या कॅबिनेटमध्ये मंत्री झाल्यानंतर मराठा समाजाच्या मराठा समाजाला बीड जिल्ह्यामध्ये मंत्रीपद नाही आता तर सार्वजनिक बांधकाम विभागाची चंद्रकात बोराडे कृष्णा पानसंबळ यांनी हम किसीसे कम नही असं म्हणत २८ डिसेंबर रोजी स्व. संतोष देशमुख हत्या प्रकरणात निघालेला एक मुक मोर्चाला अंधारातून आर्थिक रसद पुरवत पाठबळ देऊन आर्थिक रसद देत पाठबळ दिले आहे आता अधिकारीही जमातीचं राजकारण करू लागले आहेत. तर त्यातच सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य कार्यकारी अभियंता रविंद्र तोंडे यांची बदली करण्यासाठी बोराडे पानसंबळ यांनी कंबर कसली आहे आ.सुरेश धस संदीप क्षीरसागर यांच्याकडे रवींद्र तोडे यांच्या विरोधामध्ये तक्रार केली आहे ही आ. सुरेश धस सदीप क्षीरसागर यांच्याकडे तक्रार गुप्त बैठकीत केली असून ही बैठक बीड शहरातील नामांकित डॉक्टरच्या नगर रोडवर जुन्या घरी झाली आहे नगर रोडवरील एका डॉक्टरच्या जुन्या घरी ही बैठक झाल्यानंतर मात्र आता २८ डिसेंबर रोजी झालेल्या आर्थिक रसद आ. सुरेश धस संदीप क्षीरसागर राजेंद्र मस्के यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाच्या आंदोलनाला दिलेली आहे या बैठकीला बजरंग सोनवणे यांचाही अंधारातून पाठिंबा आहेच त्यामुळे आता वंजारी कर्मचारी अधिकारी व पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांच्या विरोधामध्ये बोराडे पानसंबळ व मराठ्याच दिग्गज गुत्तेदार हे इथून पुढच्याही अनेक आंदोलन मोर्चाला आर्थिक पाठबळ देणार आहेत परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग बीड चे अधिकारी अभियंता असलेले बोराडे व पानसंबळ हे सर्वात भ्रष्ट अधिकारी कर्मचारी कोट्यावधी रुपयाची टक्केवारी आणि त्यातून पंकजा मुंडे धनंजय मुंडे चे विरोधात आर्थिक रसद मुंडे बहिण भावाच्या विरोधामध्ये जाणारे हे महाराष्ट्रातील कदाचित पहिलेच अधिकारी म्हणावे लागतील?

पंकजा मुंडे धनंजय मुंडे सह वाल्मीक कराड यांनी आम्हाला त्रासच दिलेला आहे. मराठ्यांच्या अधिकाऱ्यांना संबंधित चांगल्या पदावर हटवून त्या ठिकाणी वंजारी समाजाचा अधिकारी दिल्यामुळे आम्हीही आता मराठा आंदोलनासह मराठ्यांनी त्यांच्या पाठीशी आर्थिक बळ देणार असल्याची एक बैठक बीड शहरांमध्ये झाल्याची चर्चा आहे. त्या बैठकीला आ.सुरेश धस आमदार संदीप क्षीरसागर राजेंद्र मस्के सह अनेक दिग्गज नेते व मराठा समाजातील मोजके काही अधिकारी एका नगर रोडवरील डॉक्टरच्या घरी बैठकीला होते या बैठकीमध्ये मराठा समाजातील अधिकाऱ्यांनी वंजारी समाजातील अधिकाऱ्यांना बीडच्या बाहेर हाकला असा प्रश्न मांडला आम्ही आर्थिक रस्त्यावर तयार आहोत. त्यानंतर २८ डिसेंबर रोजी झालेल्या मोर्चाला पान संबळ व बोराडे नावाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी अभियंत्यांनी आर्थिक रसद पुरविले ती धनंजय मुंडे पंकजा मुंडे यांच्या विरोधात प्रत्येक आंदोलन महाराष्ट्रामध्ये असेल त्या ठिकाणी आमची मदत असेल असंही त्या बैठकीमध्ये बोलण्यात आलेल आहे आ. सुरेश धस सदीप क्षीरसागर यांच्या मर्जीतील असलेले कृष्णा पान संबळ व चंद्रकांत बोराडे हा नंगानाच करणारा अधिकारी असल्यामुळे कोट्यावधी रुपयाची टक्केवारी व गुत्तेदारांच्या घशामध्ये आतापर्यंत कृष्णा पानसंबळ व चंद्रकांत बोराडे ने जवळपास साडेतीनशे कोटी रुपये घातल्याची चर्चा बीड शहरामध्ये ऐकायला मिळत आहे. चंद्रकात बोराडे हा दारूच्या नशा च्या नादामध्ये बीडच्या शासकीय विश्रामगृह येथे एका पार्टीच्या दरम्यान ओरडू लागला आहे.? रात्री अप रात्री सार्वजनिक बांधकाम विभागाचा अभियंता चंद्रकांत बोराडे हा बीडच्या शासकीय विश्रामगरामध्ये पार्ट्या करतो व त्या ठिकाणी आपला मुक्काम करून पुन्हा सकाळी गुड मॉर्निंग म्हणायला तयार असतो तर चंद्रकांत बोराडे चा नंगा नाच हा बीड जिल्ह्यातील अनेक नेतेमंडळी व जनतेला माहिती आहे बीड शहरात सह बीड तालुक्यातील व माजलगाव मतदार संघातील वडवणी या ठिकाणी कोट्यावधी रूपयाचे काम चालू असताना या सर्व कामातील मोठे मोठे गुत्तेदार हे या बैठकीला उपस्थित होते. संबंधित बैठकीमध्ये मोठे मोठे गुत्तेदार व कृष्णा पानसंबळ बोराडे यांनी आर्थिक तडजोड ही तत्कालीन जिल्हाध्यक्ष भाजपा व विद्यमान शरद पवारांचे राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्याकडे सोपवली असल्याची ही चर्चा आहे? पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांच्या विरोधामध्ये जर मूक मोर्चा किंवा आंदोलन होत असतील तर त्या मोर्चाला आम्ही साथ देत आर्थिक पाठबळ देऊन परंतु बीड जिल्ह्यामधील अनेक वंजाऱ्याचे अधिकारी आहेत ते अगोदर बीड जिल्ह्याच्या बाहेर हाकला कारण बीड जिल्ह्यामध्ये पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांचे वरदहस्त लाभलेले अनेक वंजारी समाजाच्या अधिकारी असतील या अधिकार्यांमध्ये आता मराठा वंजारी वाद नव्या वादाला तोंड फुटले आहे परंतु जर गुत्तेदार मोठे मोठे कंट्रक्शन वाले व चंद्रकांत बोराडे कृष्णा पानसंबळ सारखे अधिकारी जर पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांचे विरोधामध्ये आर्थिक रसद पुरवत असतील तर बीड जिल्ह्यामध्ये जातीय वादाला आता पुन्हा एकदा अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये सुद्धा जात बघून जर राजकारण होत असेल

तर ही बाब निंदनीय आहे. आणि कृष्णा पानसंबळ चंद्रकांत बोराडे सारखे अधिकारी जर आर्थिक रसद पुरवत असतील तर त्यांच्या भ्रष्टाचाराचा घडा भरलेला आहे. असंच म्हणावा लागेल कृष्णा पान संबळ बोराडे यांचा कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार हा येणाऱ्या काळामध्ये समोर येऊन बीडचे नव्याने झालेले पालकमंत्री महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ हा बोराडे पानसंबळ व वेगवेगळे मोठे गुत्तेदार कंट्रक्शन वाले यांचे पितळ उघडे करणार आहे. त्यामुळे पंकजा मुंडे व धनंजय मुंडे यांच्या विरोधामध्ये जर राजकीय नेत्यांच्या अडून जातीचा राजकारण व आंदोलन मोर्चा होत असतील तर असल्या बोराडे पानबळं सारख्या अनेक अधिकारी नेते मंडळ यांचे संगमत करून जनतेचा पैसा लाटण्याचे काम सध्या आहे त्यामुळे चंद्रकांत बोराडे पान संबळ चाभ्रष्टाचार आता उघड होणार असल्यामुळे सायंक दैनिक महाराष्ट्र आरंभ हा सातत्याने पाठपुरावा करणार आहे?

आमदार सुरेश धस संदीप क्षीरसागर हे आमच्या पाठीशी आहेत कलेक्टर असेल किंवा पालकमंत्री असेल पंकजा मुंडे धनंजय मुंडे सह बीड जिल्ह्याची यंत्रणा मी खिशात घेऊन फिरत आहोत त्या ठिकाणी आ.सुरेश धस आ.संदीप क्षीरसागर राजेंद्र मस्के म्हटल्यास नंतर विषय संपला बीड जिल्ह्यातील व पंकजा मुंडे धनंजय मुंडे मध्ये कलेक्टर बोलतच काय घडले दम आहे असं चंद्रकांत बोराडे बीडच्या शासकीय विक्रम घरात रात्रीच्या वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एका ज्युनिअर अधिकाऱ्याला बोराडे शिव्या देऊन डबा टाकून कामावर त्या काही ऑर्डरवर सह्या घेत असताना बोराडीची आरीरावी ज्युनिअर इंजिनियर ला तु गुपचिप सह्या कर तू माझा ज्युनिअर आहेस म्हणून त्या अधिकारी कर्मचाऱ्याला बोराडे दारूच्या नशेत शिव्याही देतो तू अजून पिल्लू आहेस तुला दाखवू का असंही चंद्रकांत बोराडे म्हणत आहे तर आ. संदीप क्षीरसागर, सुरेश धस चा वरदहस्त लाभलेले सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी अभियंता असलेले चंद्रकांत बोराडे व कृष्णा पान संबळ यांना पाठीशी घालणाऱ्या आ. सुरेश धस व संदीप क्षीरसागर यांना बीड जिल्ह्यामध्ये नेमकं आंदोलन मोर्चाच्या आडून काय साध्य करायचं आहे असा प्रश्न जनतेला पडला आहे तर सार्वजनिक बांधकाम विभागातील कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार असलेले बोराडे पान संबळ यांचीही सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांच्या विरोधात जर आर्थिक रसद पूरवत असतील तर हे सुरेश धस संदीप क्षीरसागर यांच्या कडून भ्रष्टाचाराची पाठराखण करतात की काय तर बोराडे पानसंबळ अशा अधिकाऱ्यांना घरचा रस्ता दाखवला पाहिजे यांच्या कार्यकाळातील झालेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कोट्यावधी रुपयांच्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या चंद्रकांत बोराडे कृष्णा पानसंबंधीच्या अनेक कारणामे आता बाहेर येणार आहेत आणि यांच्या वरती निलंबनाची कारवाई होण्याची ही दाट शक्यता वर्तवली जात असताना त्यांनी हाके विद्वाना प्रयत्न करत आठ डिसेंबर रोजी झालेल्या मोर्चा आर्थिक पाठबळ दिल्यामुळे आता नवीन वादळातून फुटले आहे तर भ्रष्टाचार नक्कीच बाहेर पडून त्यांच्यावरती कारवाई निश्चित होणार यातील मात्र शंका नाही अशीही नागरिकांमध्ये चर्चा ऐकायला मिळत आहे?

२८ डिसेंबर रोजी बीड शहरामध्ये निघालेल्या मोर्चाला आर्थिक रसद ही आता बीड जिल्ह्यातील मराठा समाजाचे दिग्गज अधिकारी नेते व गुत्तेदार यांनी पुरविले आहे स्वर्गीय संतोष देशमुख यांना न्याय मिळावा ही सर्व अठरापगड जातीतील जनतेची मागणी आहे आरोपींना फाशी झाली पाहिजे परंतु पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांच्या विरोधात स्वर्गीय संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या जर राजकारण होत असेल तर त्या ठिकाणी बीडची जनता कदापिही कोणालाच माफ करणार नाही जो गुन्हेगार आहे त्याला फाशीची शिक्षा झाली पाहिजे आता वाल्मीक करा सध्या जेलमध्ये असताना विरुद्ध संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र अक्का पिंजून काढलेला आहे वाल्मीक कराडला शिक्षा झालीच पाहिजे असं आ.सुरेश धस संदीप क्षीरसागर यांचा म्हण आहे परंतु परंतु पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांच्या साठी जर वंजारी समाजातील अधिकारी गुत्तेदार नेतेमंडळी आर्थिक रसात पुरून पाठबळ देत असतील तर आम्हीही आता पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांच्या विरोधात आता आर्थिक रसद पूर्ण ताकदीने आम्हीही कुठेच कमी नाहीत असं दाखवून दिले आहे तर वंजारी समाजातील अनेक अधिकारी कर्मचारी यांना बीड जिल्ह्याच्या बाहेर पाठवा अशी मागणी ही कृष्णा पान संबळ व चंद्रकांत बोराडे यांनी केली आहे यातच सार्वजनिक बांधकाम विभाग बीडचे मुख्य कार्यकारी अभियंता रविंद्र तोंडे यांचीही उचल बांगडी करा असं यावेळी चंद्रकांत बोराडे यांनी या ठिकाणी प्रश्न मांडला आहे आणि त्या प्रश्नाला संदीप क्षीरसागर सुरेश धस यांनीही पाठबळ दिले आहे त्यामुळे आता रविंद्र तोंडे यांची सार्वजनिक बांधकाम विभाग बीड मधून बदलीची दाट शक्यता आहे

■ पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांच्या विरोधात कृष्णा पान संबळ चंद्रकांत बोराडे यांनी २८ डिसेंबर रोजी निघालेल्या मोर्चाला आर्थिक रसात पुरवलेली आहे हा मोर्चा स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात त्यांना व त्यांच्या परिवारांना न्याय देण्यासाठी होता. आ. सुरेश धस संदीप क्षीरसागर यांच्या मर्जीतील असलेले पानसंबळ तात्या व चंद्रकांत बोराडे यांना नेमका वंजारी समाजाचे अधिकारी व नेतेमंडळी यांच्या विरोधामध्ये बोराडे व पान सबळ हे आर्थिक रसद पुरनत मराठा समाजाला आता आर्थिक पाठबळ देत आंदोलन मोर्चामध्ये अंधारातून पाठीशी उभा राहत असल्याची चर्चा सध्या नागरिकांमध्ये होत आहे तर दारूच्या नशेमध्ये तर्ररर झालेला बांधकाम विभागाचा अभियंता चंद्रकांत बोराडे हा दारूच्या पार्ट्या रात्री उशिरापर्यंत बीडच्या शासकीय विश्रामगृहात करतोच कसा चंद्रकांत बोराडे ला व्यसन घालणारा कुणीच नाही का असा सवाल आता या ठिकाणी असा प्रश्न उपस्थित आहे.

# एस पी च्या घरासमोर मुख्याधिकारी कार्यकारी अभियंता उपविभागीय अभियंता

## यांच्या फोटोचे पूलाला संरक्षण कठडे बसवण्यासाठी केले दगडाचे पूजन:- मिलिंद सरपते

बीड ।प्रतिनिधी

बीड पोलिस अधिक्षक निवासस्थान समोरील पुलाचे मुख्याधिकारी,कार्यकारी अभियंता,उपविभागीय अभियंता यांचे फोटोचे पूजन करत अभिनव आंदोलन करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. वंचितचे नेते मिलिंद सरपते यांचा वतीने हे अभिनव आंदोलन करण्यात आले.




बीड पोलीस अधीक्षक निवासस्थान समोर येथे पुलाला संरक्षण कठडे नसून याबाबत मुख्याधिकारी नगरपालिका यांना निवेदन दिले होते. की तात्काळ पुलाला संरक्षण कठडे बसवावेत व पडलेला खड्डे देखील बुजवावेत. या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. संबंधित पूल हा राष्ट्रीय महामार्ग उपविभाग बीड अंतर्गत येत असून या ठिकाणी मोटरसायकल स्वार कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. अनेकजण या ठिकाणी पडत आहेत. संबंधितांना अधिकाऱ्यांना आम्ही सांगूनही कोणीही लक्ष देत नाही. संबंधित मुख्याधिकारी, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम, उपविभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग बीड दुर्लक्ष करत आहेत तरी तात्काळ बंदोबस्त करावा याबाबत नगर पालिका कार्यालयसह जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग,राष्ट्रीय महामार्ग उपविभाग यांना निवेदनाद्वारे कळविले. परंतू कोणीही त्याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे नाविलाजास्तव आम्हांस अभिनव आंदोलन करावे लागत आहे. सबब या ठिकाणी तात्काळ दुरुस्ती करून संरक्षण कठडे बसविण्यात यावे व पडलेले खड्डे बुजवावेत.जर त्याबाबत कोणतीही कारवाई झाली नाहीतर आम्हास नाविलाजास्तव २६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी अकरा वाजता पोलीस अधीक्षक निवासस्थान समोरील पुलाचे पूजन मुख्याधिकारी,कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम, उपविभागीय अधिकारी राष्ट्रीय महामार्ग विभाग यांच्या फोटोचे पूजन करण्यास आम्ही आज २६ जानेवारी २०२५ रोजी पुलाच्या ठिकाणी वंचित बहुजन आघाडी बीड शहर करण्याचा इशारा दिला होता.तरी ९० दिवसात या ठिकाणी संरक्षण कठडे बसवले नाहीत तर या काळात या ठिकाणी अघटीत घटना किंवा जीवित हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उपविभागीय अभियंता राष्ट्रीय महामार्ग उपविभाग बीड याची व कार्यालयाची राहील.व त्यांच्यावर प्रचलित कायद्यान्वये मनुष्यवादाचा गुन्हा दाखल करण्यात येईल. आंदोलनाची दखल न घेतल्यास या पेक्षाही अति तीव्र प्रकारचे आंदोलन व आत्मदहन पुढील काळात करण्यात येईल. आंदोलनाची एक प्रत कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग लातूर यांना पाठवण्यात आली.तरी

कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील.याची नोंद घ्यावी. यावेळी मिलिंद सरपते ,पुष्पाताई तूरूकमारे,लखन जोगदंड,प्रेम कांबळे,ऋषिकेश वाघमारे आदि उपस्थित होते. ९० दिवसात पूलाला संरक्षण कठडे बसवले नाहीत तर पुढील आंदोलन अदितीव्र व आत्मदहन करण्याचा इशारा मिलिंद सरपते यांनी दिला आहे.



## गोवर्धन पवार यांना उपक्रमशील भूगोल शिक्षक पुरस्कार

बीड ।प्रतिनिधी

दिनांक (२७) शहरातील यशवंत विद्यालय या शाळेचे सामाजिक शास्त्र व क्रीडा विभागाचे शिक्षक गोवर्धन नवनाथराव पवार यांना भूगोल प्रज्ञाशोध केंद्र नवी मुंबई या संस्थेमार्फत दरवर्षी दिला जाणारा उपक्रमशील भूगोल शिक्षक पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. गोवर्धन पवार हे आपल्या सामाजिक शास्त्र या विषयांमध्ये नेहमी सक्रिय असतात. तसेच ते भूगोल या विषयासाठी नवनवीन उपक्रम आयोजित करतात. स्पर्धा परीक्षा बद्दल विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन रुजवावा व स्पर्धा परीक्षेची भीती विद्यार्थ्यांमध्ये राहू नये यासाठी प्रयत्न करतात. राज्यामध्ये जे शिक्षक भूगोल विषया विषयी जनजागृती करून अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करतात त्या शिक्षकांना हा पुरस्कार दिला जातो. या निमित्ताने या संस्थेमार्फत २०२४ चा पुरस्कार गोवर्धन नवनाथराव पवार यांना जाहीर करण्यात आला. प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी रोटरी क्लब बीड मिडटाऊन चे अध्यक्ष नितीनजी गोपन, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक गणेश वाघ, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक धुमाळ एम.एस.,कार्यकारी अभियंता सुधाकर बाहेरगव्हाणकर या मान्यवरांच्या हस्ते गोवर्धन नवनाथराव पवार यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## मंत्री दत्तात्रय भरणे आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांची भेट

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्रालय याचे मंत्री श्री. दत्तात्रय भरणे हे बीडला प्रजासत्ताक दिनानिमित्त आले होते. २६ जानेवारी भारतीय प्रजासत्ताक दिनी मंत्री दत्तात्रय भरणे हे बीड शहरांत होते. तेव्हा त्यांनी वेळात वेळ काढून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विश्वासू मानले जाणारे बीडचे भूमिपुत्र असलेले आरोग्य दूत बाजीराव चव्हाण यांची ग्रेट भेट घेतली. या भेटी मागे काय कारण होते हे कळू शकले नाही मात्र मंत्री दत्तात्रय भरणे हे अजित पवार गटाचे आमदार असून ते आज क्रीडा आणि अल्पसंख्याक विकास व औकाफ महाराष्ट्राचे मंत्री आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार हे बीड आणि पुण्याचे पालकमंत्री असल्याने, ते पुण्यामध्ये ध्वजारोहणासाठी हजर राहिले असल्याने. एकाच वेळी दोन ठिकाणी ते पोहोचू शकत नसल्या कारणाने त्यांनी त्यांच्याच पक्षाचे मंत्री असलेली दत्तात्रय भरणे यांना बीड येथे ध्वजारोहणास उपस्थित राहण्यास



कळवले असावे. त्या कारणाने मंत्री दत्तात्रय भरणे हे २६ जानेवारी दिवशी बीडमध्ये उपस्थित होते. मात्र बीडसह महाराष्ट्र राज्याचे आरोग्य दूत मानले जाणारे बाजीराव चव्हाण यांचे महाराष्ट्रातील सर्वच मंत्री आणि आमदार यांच्याशी चांगले घनिष्ठ संबंध असल्याने महाराष्ट्रातील प्रत्येक मंत्री आणि आमदार बीड दौऱ्यावर आल्यास आरोग्य दूत बाजीराव चव्हाण यांची भेट

घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयास येत जात असतात. अशाच काही कारणाने २६ जानेवारी भारतीय प्रजासत्ताक दिनी क्रीडा आणि अल्पसंख्याक मंत्री दत्तात्रय भरणे हे बाजीराव चव्हाण यांच्या कार्यास सदिच्छा भेट देण्यास आले होते. यावेळी मंत्री दत्तात्रय भरणे यांचा आरोग्य दूत बाजीराव चव्हाण यांनी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्यावर मोठ्या गाजावाजा पुष्पवृष्टी


करून आपल्या कार्यालयात मोठा सन्मानपूर्वक सत्कार केला. त्यावेळी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी बाजीराव चव्हाण यांना मी आपल्या कार्यालयास भेट देण्यासाठी येणार हा शब्द दिला होता तो पूर्ण केला बाजीराव असे बोलून दाखवले. यावरून असे लक्षात येते की बीडचे आरोग्य य दूत बाजीराव चव्हाण यांच्या आरोग्य कार्याला पाहता महाराष्ट्रातील सर्वच आमदार मंत्री हे बाजीराव चव्हाण यांच्या भेटीसाठी येतात असे बोलले जाते. या भेटेतून बाजीराव चव्हाण यांच्या हातून क्रीडा क्षेत्रातील व आपल्याकडे असलेल्या मंत्रिमंडळाच्या खात्यातील योजनेमधून बीडच्या युवकांसाठी क्रीडा क्षेत्रात युवकांना पुढे जाण्याकरता बाजीराव चव्हाण यांच्या हातात काही महत्वाच्या धुरा येऊ शकतात अशी ही चर्चा केली जात आहे. यावेळी उपस्थित धर्मवीर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य, बाजीराव चव्हाण युवा मंच महाराष्ट्र राज्य, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष बीड, व शिवसेना चे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

## ५ फेब्रुवारीपर्यंत कारवाई न झाल्यास आ. सोळंकेंना काळे फासणार- बाबुराव पोटभरे

### माजलगाव न.प. मधील आ. सोळंकेंसह सिईओ व गुत्तेदार यांनी केलेल्या भ्रष्टाचारा विरोधात पोटभरे आक्रमक

माजलगाव ।सुनिल थोरात

माजलगांव येथील हॉटेल सुखसागर येथे बाबुराव पोटभरे यांनी पत्रकार परिषद घेतली या परिषदेत बोलताना त्यांनी सांगितले की माजलगाव नगर परिषदेतील मागील अडीच ते तिन वर्षांच्या प्रशासकीय कार्यकाळामध्ये शेकडो कोटी रुपयांचा निधी विकास कामासाठी आला.शहरामध्ये अनेक योजनेमधुन हा निधी शासनाकडुन उपलब्ध होत असतांना नगरपरिषद मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांच्या मनमानी कारभारामुळे व आ. सोळंके यांचेसह गुत्तेदाराच्या संगणमताने या भ्रष्टाचारी मंडळींनी माजलगावकरांचा विश्वासघात केला असुन शासनाच्या तिजोरीला चुना लावण्याचे पाप केले आहे. आम्ही जिल्हाधिका-यांकडे माजलगाव न.प. च्या भ्रष्ट कारभाराची चौकशी करण्याची मागणी केली असुन येणा-या ५ फेब्रुवारीपर्यंत ही चौकशी होवुन भ्रष्ट मुख्याधिकारी चव्हाण यांना जेलमध्ये टाकण्याचे काम व गुत्तेदारास काळ्या लिस्टमध्ये टाकण्याचे काम जिल्हाधिका-यांनी न केल्यास या



सीईओ व गुत्तेदार यांना पोसणाऱ्या आ. सोळंकेंच्या तोंडाला काळे फासण्याचा कार्यक्रम करणार असुन उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन ५ फेब्रुवारीपासुन सुरु ठेवणार असा इशारा बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी दिला. या यावेळी पुढे बोलतांना श्री. पोटभरे म्हणाले की, माजलगाव शहरातील नागरिकांना मुख्याधिकारी चव्हाण व आ. सोळंके यांनी वेड्यात काढले असुन माजलगावकरांचा विश्वासघात केला आहे. ८ ते १० कोटी रुपयांत होणारी कामे ५० कोटीची बोगस अंदाजपत्रके तयार करून आर्थिक लुट चालविली आहे. शहरामध्ये साठ फुटी रसत्यांची गरज नसतांना केवळ अंदाजपत्रके वाढविण्यासाठी साठ फुट रस्ते दाखवुन अव्वाच्या सव्वा बिले उचलण्याचे पाप ही मंडळी करत आहेत. माजलगाव नगरपरिषदेमध्ये आंधळ दळतंय अन् कुत्र पिठ खातंय अशी परिस्थिती झाली असुन मुख्याधिकारी चव्हाण यांचा मनमानी कारभार केवळ आ. सोळंके यांच्या आशिर्वादाने चालु आहे. नागरिकांना कायम वेठीस धरण्याचे काम मुख्याधिकारी चव्हाण करत असुन माजलगाव न.प. कारभार ते कार्यालयातून कधीच करत नाहीत ते कायम गैरहजर असतात. शहरात ९० टक्के पाईपलाईन झालेली असतांना पाईपलाईनसाठी पुन्हा ९२ कोटी रुपयांच्या मान्यतेसाठी शासनाकडे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला आहे. याची सगळी चौकशी तात्काळ करणे गरजेचे आहे. नगरपरिषदे अंतर्गत आरक्षित जागेच्या खरेदी विक्रीचे व्यवहार आ. सोळंकेंच्या आशिर्वादाने मुख्याधिका-यांनी केले असुन माजलगाव शहराची वाट लावण्याचे पाप ही मंडळ करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.पुढे पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देत त्यांनी सांगितले की येणाऱ्या नगरपरिषद निवडणुकीत भ्रष्टाचाऱ्यां सोबत जाणार नाही.यावेळी पत्रकार परिषदेला उपसभापती श्रीहरी मोरे, नवनाथ धाईजे, प्रदिप पट्टेकर यांचसेह अनेक कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## अंधापुरी घाट जिल्हा परिषद शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न!

बीड - बीड तालुक्यातील अंधापुरी घाट येथील जि प प्रा शाळेतील वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले..प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळेच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. मुलांच्या कलागुणांचा प्रत्यक्ष विकास व्हावा यासाठी जि प प्रा शाळा यांच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी संध्याकाळी संपन्न झाले..



स्नेहसंमेलनाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे श्री महेश मोटे केंद्रीय मुख्याध्यापक रौळसगाव तसेंच श्री विजय खोसे संचालक शिवाजी महाराज शिक्षक पतसंस्था बीड यांच्या हस्ते जिजाऊ व सावित्रीबाई यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आले.. यावेळी सरपंच,उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गोरख जगताप, जि प प्रा शाळा चे मुख्याध्यापक जगदाळे सर, सहशिक्षक जाधव सर,महेश जगताप सर,पत्रकार दिपक वाघमारे,कार्यक्रमाला आलेले मान्यवर तसेंच गावातील महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.शाळेच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करून कार्यक्रमाला आलेल्या सर्वांचे स्वागत करण्यात आले.

शाळेतील विद्यार्थ्यांनी कलाविष्काराची अनेक गाणी सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.. गाण्यावर पालकासह उपस्थितांनी दाद दिली.. कार्यक्रमासाठी चिमुकल्यांनी केलेली वेशभूषा रसिकांचे.. लक्ष वेधून घेत होती..ग्रामस्थ व प्रेक्षकांनी तसेंच पालकांनी विद्यार्थ्यांना भरघोश बक्षीसे देत त्यांचे मनोबल वाढवले.. सहशिक्षक जाधव सर यांनी शाळेच्या वतीने सर्वांचे आभार मानले..कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे सहशिक्षक जाधव सर, महेश जगताप सर, मुख्याध्यापक जगदाळे सर यांनी विशेष परिश्रम घेतले.. याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने जाधव सर जगदाळे सर महेश सर यांचा सत्कार करण्यात आला.

## बीड ग्रामीण पोलिसांची अवैध मुरूम करणाऱ्या हायवावर कारवाई

बीड ।प्रतिनिधी

हायवामध्ये बेकायदेशीर रित्या मुरूम जात असल्याची माहिती बीड ग्रामीण पोलिसांना झाल्यानंतर पोलिसांनी सदरील हायवावर कारवाई केली. ही कारवाई ग्रामीण पोलिसांनी केली आहे. सहाय्यक पोलिस निरिक्षक बाळराजे दराडे हे गेल्या अनेक दिवसापासून अवैध धंद्या विरोधात कारवाई करत आहेत. त्यांनी आतापर्यंत अनेक कारवाया केल्या काल महालक्ष्मी चौक मार्गे एका हायवामध्ये अवैध रित्या मुरूम जात असल्याची माहिती पोलिसांना झाल्यानंतर पोलिसांनी या हायवा चालकाकडे मुरूमा संदर्भात माहिती घेतली असता



गाडी राजस्थान पार्सिंगची असल्याचे समोर आले. त्याकडे रॉयल्टी पावती किंवा गाडीची कागदपत्रे मिळून आली नाही. त्यामुळे गाडी ताब्यात घेण्यात आली. मुरूमासह गाडी असा एकूण १८ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलिस अधिक्षक नवनीत काँवत, सहाय्यक पोलिस अधिक्षक सचिन पांडकर, डीवायएसपी गोल्डे, पो.नि. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली बाळराजे दराडे, मोराळे, मस्के, जगताप, नाईक, सानप, कृष्णा जायभाय यांनी केली.

# चंपावती विद्यालयातील सोहम लांगोरे व सेंट अँन्स स्कूलची वेदा कट्टे यानी खुल्या बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला

## बीड जिल्हा डिस्टिक चेस असोसिएशन तर्फे आयोजित खुल्या बुद्धिबळ स्पर्धेत सोहम लांगोरे व वेदा कट्टे यांचे यश

बीड ।प्रतिनिधी

प्रजासत्ताक दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त बीड डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशन तर्फे कट्टे हॉस्पिटल बीड येथे खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्ह्यातून अनेक खेळाडू सहभागी झाले होते. सरस्वती प्रतिमेचे पूजन करून स्पर्धेची सुरुवात करण्यात आली.या स्पर्धेत खुल्या गटातून सोहम लांगोरे व लहान गटातून कु.वेदा कट्टे यांनी प्रथम क्रमांक मिळवला. यावेळी स्पर्धकांना मार्गदर्शन करताना मुख्य प्रशिक्षक दत्तात्रय क्षीरसागर यांनी सांगितले की,मैदानी खेळ आपल्या शारीरिक क्षमतेची कसोटी पाहतात तर बुद्धिबळासारखा खेळ आपली स्मरणशक्ती, निर्णयक्षमता, एकाग्रता, आत्मविश्वास अशा अनेक गुणांचा विकास करीत असतो. त्यामुळे आजच्या स्पर्धेच्या युगात व नित्याच्या जीवनशैलीत बुद्धिबळ खेळाचा विद्यार्थ्यांना फायदा होतो.

सदरील खुल्या बुद्धिबळ स्पर्धेत इयत्ता ०१ ली ते ०५ वी तसेच इयत्ता सहावी व त्यापुढील अशा दोन वयोगटातील खेळाडू सहभागी झाले होते. दोनही गटातील एकूण पहिल्या पाच विजेत्या खेळाडूंना आकर्षक बक्षीस देण्यात आली.सदरील स्पर्धा ही आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ नियमानुसार खेळवली गेली.स्पर्धेतील प्रथम पारितोषिक ऐश्वर्या डिजिटल कलर लॅब यांच्यातर्फे देण्यात आले. तसेच कट्टे हॉस्पिटलचे डॉ.विजय कट्टे यांच्यातर्फे विजेत्या स्पर्धकांसाठी ट्रॉफी देण्यात आली.खुल्या गटातून प्रथम सोहम अतुल लांगोरे द्वितीय झिशान पटेल, तृतीय आदित्य बाळू घुगे,चौथे दीपक ढेपे आणि पाचवे बक्षिस विश्व होळकर यांना मिळाले. तर इयत्ता ०१ ली ते ०५ वी गटात कु.वेदा विजय कट्टे प्रथम, पार्थ मस्के द्वितीय,अर्जुन वाणी तृतीय,



दक्षतराज फाळके चतुर्थ तर सार्थक पालसिंगणकर यास पाचवे बक्षिस मिळाले.या सर्व विजेत्यांना रोख रक्कम व ट्रॉफी असे बक्षिस स्वरूपात देण्यात आले.पंच म्हणून श्री.दत्तात्रय क्षीरसागर सर व श्री. रामप्रसाद शेंडगे सरांनी काम पाहिले.स्पर्धा यशस्वी करण्यासाठी डॉ. विजय कट्टे,संजय होळकर,वाणी सर,मस्के सर,हांगे सर,पालसिंगणकर सर यानी विशेष सहकार्य केले.जिल्ह्यातील पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी झाले.विजेत्या स्पर्धकांचे सर्वांनी कौतुक व अभिनंदन केले.

# निलंबनाच्या कार्यवाहिमुळे संपवला स्वतःचा जीवन

## तणावात असल्याने स्वतःच्या शेतात वाहकाने केली आत्महत्या

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचाळा या गावातील बस वाहक ( कंडक्टर) दत्ता अंबलकर यांनी प्रवाश्याने तिकिट न काढल्याने निलंबनाची कार्यवाही केल्यामुळे २६ जानेवारीच्या मध्यरात्री स्वतःच्या शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

अंबलकर हे दहा वर्ष्यापासून माजलगाव परिवहन महामंडळाच्या आगारात वाहक म्हणून काम करीत होते. महिनाभरापूर्वी एक प्रवाश्याने तिकीट न घेता प्रवास केल्याचे उघडकीस आल्यानंतर अंबलकर यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली होती. या कार्यवाहिमुळे तणावात असल्याने टोकाची भूमिका घेत स्वतःचा जीवन संपवला असून हा मंडळाच्या चुकीच्या व्यवस्थेचा बळी आहे असा आरोप अंबलकर यांच्या नातेवाईकाने केला आहे.

महिनाभरापूर्वी अंबलकर यांना निलंबित केले होते त्यामुळे तणावात होते. याच तणावामुळे १२ जानेवारी रोजी कोणालाही न सांगता घरातून निघून गेले होते. त्यानंतर माजलगाव पोलिस ठाण्यात त्यांच्या वडिलांनी मिसिंगची तक्रार नोंद केली होती. दरम्यान अंबलकार यांनी २६ जानेवारी रोजी स्वतःच्या शेतातील लिंबाच्या झाडाला दुरीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. सकाळी शेतात त्यांचे वडील गेल्याने ही बाब उघडकीस आली. त्यानंतर वडवणी पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला व शवविच्छेदनासाठी कुप्पा येथील आरोग्य केंद्रात पाठवण्यात आला. नातेवाईकाने मृतदेह ताब्यात न घेण्याचे निर्णय घेतल्याने तणावाचे



वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर माजलगाव परिवहन आगारचे आगार प्रमुख कोडपकर यांच्यासह कर्मचाऱ्याने कुप्पा येथे धाव घेऊन नातेवाईकांची समजूत काढली व कुटुंबातील एका व्यक्तीला परिवहन मंडळात नौकारीला घेता येईल असे आश्वासन दिल्यानंतर नातेवाईकाच्या मृतदेह ताब्यात घेतला व चिंचाल येथे दुपारी चार वाजण्याच्या दरम्यान अंत्यसंस्कार करण्यात आल्याचे समजते.

परिवहन मंडळाच्या चुकीच्या धोरणामुळे माझ्या भावाने आत्महत्या केली. प्रवाश्याने तिकीट न काढता प्रवास केला त्यामुळे निलंबनाची कार्यवाही करणे हे चुकीचे धोरण होते.

– महादेव अंबलकर , मयत व्यतीचा भाऊ

२) सदरील वाहकावर विभागीय कार्यवाही करण्यात आली होती. यामुळे मला यामध्ये अधिकचे काही सांगता येणार नाही.

: एस. डी. कोळपकर, माजलगाव आगार प्रमुख



## स्वागत सत्कार..

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष गणेशजी मोकाशी हे वडवणी शहरात आल्यानंतर त्यांचा वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे, वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेचे जेष्ठ मार्गदर्शक पत्रकार सुधाकरराव पोटभरे, वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष पत्रकार सतिश सोनवणे यांनी यथोचित सत्कार व सन्मान केला. यावेळी भाजपचे नेते प्रा.सोमनाथराव बडे,माजी नगरसेवक आत्माराम जमाले पाटील,वारकरी संप्रदायाचे प्रमुख बब्रुवान शेंडगे पाटील,डॉ.मारोतराव आंधळे, शिवसेनेचे नेते अंगदराव जिजा जाधव पाटील,दैनिक राज्य लोकतंत्र चे जिल्हा प्रतिनिधी अशोक खाडे सह आदींची उपस्थिती होती.

# शासनाच्या योजनेतून व्यवसाय सुरु करण्याची संधी मिळाली तिचे सोने करा– मा. आ. साहेबराव दरेकर

## आष्टीत ग्री क्लिनिक ग्री बिजनेस कोर्स च्या दहाव्या बॅच चा शुभारंभ

आष्टी ।प्रतिनिधी

**आष्टी तालुक्यातच नव्हे तर मराठवाड्यात जयदत्त शिक्षण कृषी जलविकास प्रतिष्ठान या संस्थेचा नाव लोकिक आहे पाणलोट क्षेत्र विकास आणि ग्रामीण भागात लघु उद्योग करण्याचे अनेक प्रशिक्षण या संस्थेच्या माध्यमातून झाले आहेत कृषी मंत्रालय भारत सरकार आणि नाबार्डच्या माध्यमातून ग्री क्लिनिक ग्री बिजनेस कोर्सच्या माध्यमातून ग्रामीण भागातील कृषी क्षेत्राशी निगडित शिक्षण झालेल्या विध्यार्थ्यांना शासनाच्या योजनेमधून आर्थिक मदत घेऊन उद्योजक बनता येईल शेतकऱ्यांच्या मुलांसाठी हे अत्यंत चांगले आहे**

विद्यार्थ्यांनी जिद्द चिकाटी वेळेचा उपयोग करून आपला उद्योग यशस्वी केला पाहिजे असे मत माजी




आमदार साहेबराव दरेकर यांनी जयदत्त शिक्षण कृषी जलविकास प्रतिष्ठान मध्ये ग्री क्लिनिक ग्री बिजनेस कोर्सच्या दहाव्या बॅचच्या शुभारंभ प्रसंगी व्यक्त केले या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे हे होते ते म्हणाले की अत्यंत चांगली संधी विद्यार्थ्यांना या कोर्स च्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे या योजनेच्या माध्यमातून आपण आपले जीवन बदलण्यासाठी प्रयत्न करावेत ग्रामीण भागाचा चेहरा मोहरा बदलायचा असेल तर शासनाने उपलब्ध करून दिलेल्या संधी चे सोने करावे याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष तथा सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांनी संस्थेच्या कार्याविषयी माहिती देत या कोर्सच्या माध्यमातून आपण उद्योजक होणार आहात पण प्रामाणिक पणा आपल्या असू द्या असे म्हटले या प्रसंगी संस्थेचे नोडल ऑफिसर विठ्ठलराव गुंजाळ,पत्रकार संतोष सानप, मुजाहिद पठाण संस्थेच्या कोऑर्डिनेटर विद्या पोकळे यांच्यासह कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

## एसटी भाडेवाढ विरोधात शिवसेना जिल्हाप्रमुख सातपुते, वरेकर यांच्या

# नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी चक्काजाम,आंदोलने

जनसामान्याच्या आयुष्याचा अविभाज्य भाग असलेल्या एसटी भाडेवाढ विरोधात शिवसेना पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब,शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब,शिवसेना नेते सुनीलजी प्रभू साहेब, शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब, शिवसेनेचे मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूळकर साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब,सह संपर्कप्रमुख बदामराव आबा पंडीत साहेब,सह संपर्कप्रमुख डॉ.लक्षराज सानप साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज बीड जिल्हा

शिवसेना उद्धव – बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने बीड मध्यवर्ती बस स्थानकातील गेटसमोर आज चक्काजाम आंदोलन करण्यात आले.यावेळी जिल्हाप्रमुख परमेश्वर




सातपुते, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर बोलताना म्हणाले की आम्ही सत्तेत आल्यावर राज्यामध्ये गोर गरिबांसाठी काम करु असे आश्वासन महाराष्ट्र राज्यात महायुती सरकारने दिले होते परंतु हे बोलले एक आणि प्रत्यक्षात केले एक सत्तेमध्ये आल्या बरोबरच एसटीच्या भावात पंधरा टक्के वाढ करून सर्वसामान्य जनतेला वेठीस धरण्याचे काम या सरकारने केले आहे अशा निष्काळजी सरकारचा निषेध करुन ही केलेली भाडेवाढ रद्द न केल्यास बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी सातपुते, वरेकर यांनी दिला.

याबरोबरच बीड जिल्ह्यात आष्टी व माजलगाव विधानसभेतील आष्टी येथे तालुकाप्रमुख सुभाषजी राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत व शिरूर तालुक्यात आजिनाथ खेडकर व तालुका प्रमुख सोपान काका मोरे यांच्या प्रमुख शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने या विरोधात चक्काजाम करून निवेदन देण्यात आले.राज्य शासनाने गोरगरीब जनतेवर लादलेल्या आर्थिक भाडे विरोधात तीव्र निषेध व्यक्त केला. व एसटी भाडेवाढ रद्द झालीच पाहिजे..परिवहन मंत्र्याचा धिक्कार असो..परिवहन मंत्री हाय.. हाय.. सर्वसामान्य जनतेच्या पोटावर पाय देणाऱ्या भाजप सरकारचा धिक्कार असो अशा जोरदार घोषणा देत सदरील निर्णय तातडीने रद्द करण्याची शासनाकडे मागणी केली.

यावेळी तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण, महिला आघाडीच्या बीड विधानसभा संघटिका मीराताई नवले, जिल्हा सचिव श्रीकृष्णजी गायके, उपतालुका प्रमुख अशोकजी सगळे, उपतालुकाप्रमुख प्रकाशजी धुताडमल, उपतालुकाप्रमुख दादासाहेब सोनवणे, तालुका संघटक कलीम भाई शेख,गणेश डोईफोडे,विनोद गूंड पाटील,दिपक घोडके पाटील,अजय गायकवाड,रमेश नवले,आसाराम वैद्य, भरत खरात,भीमराव कुटे,बाबू कुटे,सुनील शेळके,राजाभाऊ नवले, चंद्रकांत बजगुडे,बीड जिल्हा शिवसेनेचे आजी माजी पदाधिकारी, शिवसैनिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने

## बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांची दादागिरी सुरूच

# शेतकऱ्यांना पोलिस केस करून तुरुंगात टाकण्याची धमकी ; पोलिस अधीक्षक नवनित कांवत साहेब शेतकऱ्याची बैठक कधी घेताय?? :- डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांची दादागिरी सुरुच असुन नुकसान भरपाई मागणा-या शेतकऱ्यांना पोलिस केस करून तुरुंगात टाकण्याच्या धमक्या पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांकडुन देण्याचा प्रकार घडला असुन पोलिस अधीक्षक नवनीत कांवत यांनी पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांची बैठक घेऊन त्यांना संरक्षण देण्याची हमी दिली. कंपन्यांकडुन खंडणीखोरांवर कठोर कारवाई व्हायलाच हवी. मात्र पवनचक्की कंपन्यांचे अधिकारी शेतकऱ्यांची फसवणूक करून त्यांना पोलिस केस करून तुरुंगात टाकण्याची भाषा करत धमकावत असतील तर मग शेतकऱ्यांचे संरक्षण कोणी करायचे? मग पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांची बैठक घेतली तर पिडीत शेतकऱ्यांची बैठक कधी घेणार ? पिडीत शेतकऱ्यांना वाली कोण ? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी पोलिस अधीक्षक नवनीत कांवत यांना केला आहे.बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील शेतकऱ्यांची अहमदपूर ते अहिल्यानगर राज्य महामार्गावर शेतजमीन असुन २ वर्षांपासून रेन्यु पावर कंपनीने गोडाऊन साठी भाडेतत्त्वावर घेतली होती. शेतकऱ्यांना एकरी ३० हजार रूपये प्रतिवर्ष भाडेतत्त्वावर शेतजमीन घेतली. त्यांना वार्षिक भाडेही दिले




मात्र जाताना जमिन पुर्ववत करून देण्याचे बांधबंदिस्ती, खडकाळ जमिनीत गाळ टाकुन देण्याचे आश्वासन मात्र साफ विसरून गेले आज दि.२७ कंपनीच्या गाड्या जागा खाली करत असताना शेतकऱ्यांनी गाड्या अडवून विचारणा केली असता त्यांना गाड्या सोडुन द्या अडवु नका अन्यथा पोलिस केस करून तुरुंगात टाकु अशी धमकी दिल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत.आता त्यांनी आमच्यावर गुन्हे दाखल करूनच पहावेत असे महादेव सदाशिव कदम, बाबासाहेब कदम,संजय घरत,विष्णु घरत यांनी म्हटले आहे.पवनचक्की कंपन्यांना आम्ही अगोदर जागा देत नव्हतोच.तेव्हा विनवनी केल्यानंतर तयार झालो.परंतु दंड मोडला,चिरे काढले तवाच आम्ही म्हणलं आमच्या रानाचं वाटुळं व्हाय लागलंय आम्हाला शेतजमीन नाही द्यायची.तेव्हा म्हणले आम्ही जाताना वाहनांच्या वावरामुळे खडकाळ होणा-या जमिनीत तलावातील गाळ टाकु, तसेच पहिल्या सारखं दंड आणि बांधबंदिस्ती करून देऊ पण आज सगळ्या गाड्या सामान घेऊन चालल्या आम्ही आधिका-यांना विचारले असता अगोदर म्हणले ४-८ दिवसांनी येऊन करून देऊ.नंतर तर म्हणले गाड्या सोडुन द्या नाहीतर पोलिस केस करून तुरुंगात टाकु. मग आम्ही म्हणलो आता पोलिस केस करूनच दाखव बघु काय होईल ते अशी संतप्त प्रतिक्रिया महादेव सदाशिव कदम यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना दिली.

पोलिस अधिक्षक नवनीत कांवत यांनी २ जानेवारी रोजी बीड जिल्ह्यात पवनचक्की उभारताना त्रास होऊ नये म्हणून सौर व पवन ऊर्जा प्रकल्प अधिकाऱ्यांची बैठक घेतली. आणि दलाल खंडणीखोरांना घाबरू नका ,गावगुंड खंडणी मागत असतील तर जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार करा. स्थानिक पोलिसांचे नंबर ठेवून त्यांना माहिती द्या आणि संकट समय ११२ नंबरला फोन करा अशा प्रकारच्या विविध सूचना दिल्या परंतु हे पवनचक्की कंपनी वाले धुतल्या तांदळासारखे अजिबात नाहीत.त्यांनी बीड जिल्ह्यातील कायदा अनुसूव्यवस्था बाधित केले आहे त्यांचे रक्षण करणे हे पोलिसांची जबाबदारी आहे त्याचबरोबर इथल्या शेतकऱ्यांना संरक्षण देणे. पवनचक्की कंपन्यांकडून त्रास होत असेल तर त्यांचे संरक्षण करणे हि सुद्धा त्यांची जबाबदारी आहे.त्यामुळे पिडीत शेतकऱ्यांची बैठक पोलिस अधीक्षक साहेब कधी घेणार

# जलदुत राजेश काकडे धाराशिव मध्ये डेरे दाखल मित्र मंडळ स्थापन करून ओमराजे निंबाळकर यांना भेटले

राजेश हा बीड वरुन आला आहे असे उद्गार ओमराजे निंबाळकर यांनी आमदार असणारे कैलास पाटील यांना केले आणि सगळे कर्म कामी लागल्याची भावना राजेश ने व्यक्त केली सोबत विनायक काकडे, दिपक काकडे, किशोर काकडे, सखाराम शहामाने होते २६ जानेवारी रोजी राजेश धाराशिव मध्ये गेला आणि ओमराजे निंबाळकर यांना भेटला खुप काही चर्चा झाली आणि खासदार साहेब भाऊक झाले की एक तरूण आपल्या दुष्काळी भागावर मात करत आहे आपल्या बायकोचे सोनं मोडुन पाणी उपलब्ध करून ५ खेडे गावे पाणीदार करून टाकले लोकंप्रतिनिधि यांच्या कडून जवळ जवळ २० हजार लिटर पाणी साठवेल एवढी सोय करून भिषण दुष्काळ दुर केला पणं या कामा मध्ये राजेश ने घर दार सगळे उघड्यावर पाडले परंतू त्यांनी आपली सेवावत्ती सोडली नाही अनेक संकट आली ते तो सरात गेला वेळ निघुन गेली सगळ्या समाजात व गावागावात राजेश चे नाव आज नाव लौकिक आहे, पणं तो थांबला नाही कायम समाज सेवा त्यांनी आता आपल्या जीवनातील एक प्रसंग म्हणून सोबत ठेवली आहे, खुप असे लोकं आहेत ज्यांना गावी जाण्यासाठी किंवा जेवणा साठी राजेश हा पुर्ण वेळ देत असतो पणं राजेश कधी थकत



किंवा दमत नाही सेवा करून तो त्याच्या जीवनातली दिवस मोजत आहे धार्मिक आध्यात्मिक क्षेत्र अंगिकारून राजेश रामचंद्र काकडे नावलौकिक आहे, राजेश ने ओमराजे निंबाळकर यांना भेटून एक आदर्श वस्तूपाठ सुरु केले आहे त्याच्या या मनमिळाऊ स्वभावाचे व कामाचे ओमराजे निंबाळकर खासदार धाराशिव व आमदार कैलास पाटील या दोघांनी राजेश साठी धाराशिव मोकळे केले आहे असेच जिवनाचे गणित जुळवत जा खुप मोठा हो आणि समाज सेवा करतं रहा मी तुझ्या पाठीशी आहे असे वचन या वेळी खासदार ओमराजे निंबाळकर साहेब यांनी दिले आहे करिता मित्र मंडळ यांच्या वतीने साहेबांना एक फ्रेम देऊन सन्मानित केले.



# एआयएमआयएम पक्षाच्या मुख्य कार्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा !

बीड ।प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे यावेळीही एआयएमआयएम पक्षाच्या शहरातील बशीरगंज भागात असलेल्या मुख्य कार्यालयात मा.जिल्हाध्यक्ष ड. शेख शफीक भाऊ यांच्या हस्ते देशाच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिवसानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.२६ जानेवारी २०२५ रविवार रोजी सकाळी ९:३० वाजता एआयएमआयएम पक्षाच्या मुख्य कार्यालयात मा.जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय ध्वजाला सलामी देऊन राष्ट्रगीताचे गायन केले. यावेळी मा.बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा बीड तालुका अध्यक्ष खन्ना भैय्या, जेष्ठ नेते सलाम सेठ, नगरसेवक मोमीन अजहर,मा.मार्गदर्शक रियाज खान,मा. जिल्हा समन्वयक सैफअली लालू,मा . जिल्हा पेंशनर कर्मचारी अधिकारी अध्यक्ष शेख वजीर सर, शहर उपाध्यक्ष शेख शाकेर, मा. युवक शहराध्यक्ष शेख सलमान , हाफेज वासेक साहेब, मा.सोशल मिडिया अध्यक्ष सोहेल शिकलकर, मा.सोशल मिडिया मराठवाडा सदस्य शेख मुदस्सीर, मा. आरोग्य सेल शहराध्यक्ष सोहेल मोमीन,अय्युब भाई अमीर सहाब,रोहीब भाई, जावेद खान, शाहरुख खान, माजेद खान, वाजेद खान, उमर भाई, सलमान भाई, कैफ भाई , एजाज शिकलकर, नाजेम मोमीन, शेख फैजान,शेख रेहान,आदील खान, शेख शाहरुख, शेख मुखीम,साहील मनियार, जुनेद भाई आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीडच्या सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी आ.क्षीरसागर अजितदादांकडे

## तातडीने कार्यवाही करण्याचे प्रधान सचिवांना अजितदादांचे निर्देश

बीड ।प्रतिनिधी

बीड शहराला सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने पाठपुरावा करत आहेत. याचसंदर्भात मंगळवारी (दि.२८) रोजीही आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांची भेट घेतली. यावर अजितदादांनी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांना तातडीने हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

मुबलक प्रमाणाय पाणीसाठा उपलब्ध असून देखील बीड शहराला सुरळीत पाणीपुरवठा होत नाही. पंधरा-पंधरा दिवसांतून एकदा पाणी बीड शहरवासीयांना मिळत आहे. याचे कारण म्हणजे सध्या जी पाणीपुरवठ्याची योजना कार्यरत आहे ती अपुरी पडत आहे. परंतु सध्याच्या परिस्थितीनुसार पुरेशी असणारी अमृत अटल योजना काम पूर्ण होऊन उपलब्ध देखील आहे. परंतु बीड नगरपालिकेकडे ३६ कोटी रूपयांचे वीजबिल थकलेले असल्याने महावितरण विभाग या नवीन पाणीपुरवठा योजनेला वीज कनेक्शन देत नाही. परिणामी पाणी आणि योजना



हे दोन्ही उपलब्ध असताना बीडकरांना पाण्यासाठी पंधरा-पंधरा दिवस वाट पहावी लागते. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने पाठपुरावा केलेला आहे आणि तो आताही सुरूच आहे. आ.क्षीरसागर यांनी अनेक वेळा अधिवेशनात हा प्रश्न मांडला आहे. अनेकवेळा सरकारदरबारी मंत्री महोदयांकडे बैठका घेऊन हा प्रश्न लावण्यासाठी विनंती केली आहे. यासोबतच प्रशासकीय अधिकाऱ्यांकडेही याबाबतच्या बैठका घेऊन यात मार्ग काढण्यासाठी प्रयत्न केले आहेत. शेवटी या विषयात आ.संदीप क्षीरसागर यांनी माजी आ.सय्यद सलीम यांच्या माध्यमातून उच्च न्यायालयात जनहित याचिका देखील दाखल केली होती.

आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न विधिमंडळ, मंत्रालय, प्रशासन आणि न्यायालय अशा सर्वच स्तरावर मांडला आहे. याबाबत सातत्याने पाठपुरावा केला आहे. आताही याच प्रश्नावर आ.संदीप क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांची भेट घेतली आहे. त्यावर ना.अजिदादांनीही लगेचच, बीड शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी कार्यवाही करा, असे निर्देश नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम कुमार गुप्ता यांना दिले आहेत. आता ना.अजित दादा पवार यांच्या माध्यमातून बीड शहराचा गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागेलच अशी अपेक्षा आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान याप्रसंगी ना.हसन मुश्रीफ साहेब तसेच वरिष्ठ स्तरावरील प्रशासकीय अधिकारी देखील उपस्थित होते.

---

# गेवराई येथे बंजारा ब्रिगेडची कार्यकारणी बैठक रविकांत राठोड यांच्या उपस्थितीत संपन्न

## तालुकाध्यक्ष अमोल राठोड तर उपाध्यक्ष पोपट चव्हाण यांची निवड

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : येथील शासकीय विश्रामगृह येथे बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड यांचे उपस्थिती कार्यकारणी बैठक संपन्न झाली आहे. मागील काही दिवसांपूर्वी बंजारा ब्रिगेडची गेवराई तालुका कार्यकारणी निवड करण्यात आली आहे. या अनुषंगाने जिल्हा सचिव योगेश पवार यांच्या नेतृत्वाखाली बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रवीकांत




राठोड यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. गेवराई तालुका अध्यक्ष अमोल राठोड तर उपाध्यक्ष पोपट चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे. तसेच सचिव योगेश राठोड, शहर अध्यक्ष ड नितीन पवार या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचे स्वागत केले. गोरगरिबांसाठी तसेच समाजासाठी एकजुटीने काम करत रहा असे बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रवीकांत राठोड यांनी बोलताना सांगितले. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष किरण पवार, विभागीय उपाध्यक्ष सतीश पवार, विभागीय संघटक राठोड यांनी मार्गदर्शन केले.

---

# चिंचेवाडी जिल्हा परिषद शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

आष्टी ।प्रतिनिधी

तालुक्यातील चिंचेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साह संपन्न झाला यावेळी लहान लहान शाळेतील चिमुकल्यांनी माझ्या पप्पांनी गणपतीत आणला या गाण्यावर नागरिकांची मने जिंकली ग्रामीण भागातील या शाळेतील विद्यार्थ्यांचे कलागुण बघून उपस्थित नागरिक व पालक मंत्रमुग्ध झाले. यावेळी चिंचेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेला मैं



हू ना सेवाभावी संस्था ठाणे यांच्या वतीने शाळेला दोन संगणक संच भेट देण्यात आले हे संगणक संच भेट देण्यासाठी मोलाचे योगदान प्रवीण अशोक माळशिखारे यांनी प्रयत्न केले यावेळी शाळेतील मुख्याध्यापक विठ्ठल गव्हाणे सर सहशिक्षक जालिंदर ढवळे ,मोहन वायभासे ,तर या कार्यक्रम प्रसंगी गणेश सुभाष वायभासे ,(उपसरपंच देऊळगाव घाट व चिंचवाडी )कांताशेठ दुकानदार, दत्तू वायभासे, मारुती वनवे ,आजिनाथ वायभासे, सुभाष वायभासे ,(शालेय शिक्षण समिती अध्यक्ष) सुनील वायभासे,जयदिप वायभासे, सचिन वायभासे,आदी मान्यवर ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते पाच हजार रुपये रोख बक्षीस शाळेला देण्यात आले उपस्थित सर्वांचे आभार शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल गव्हाणे यांनी माणले

---

# कार्यकारी अभियंता कृष्णा पान संबळ हटवा , अन् आष्टी मतदार संघ खड्ड्यात जाण्यापासून वाचवा

सुरेश/ कांबळे

आष्टी प्रतिनिधी, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक दोन बीड येथील प्रभारी कार्यकारी अभियंता कृष्णा लिंबाजी पानसंबळ हे सार्वजनिक बांधकाम विभागात नियुक्त झाल्यापासून सातत्याने बीड विभागातच कार्यरत आहेत त्यांचे अनेक पुढाऱ्यांची लागेबांधे असून अनेक निकृष्ट दर्जाची बोगस कामे केली आहेत अनेक कामे अनियमित आढळून येत असताना सध्याही याच पद्धतीने कामे सुरू आहेत शाखा अभियंता पदावर कार्यरत असताना संबंधित कृष्णा पान संबळ यांच्याकडे काही काळ बीड येथील सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक दोन चा उपकार्यकारी अभियंता म्हणून



पदभार होता तसेच या काळात शिरूर पाटोदा या दोन्ही उपविभागात शाखा अभियंता व शिरूर कासारचे उपअभियंता म्हणून तसेच पैठण रस्त्यावरील पुल या कामात मोठ्या प्रमाणात अनियमित करण्यात आलेली

## पान संबळ यांच्या काळातील भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करावी कैलास दरेकर यांची मागणी

आहे हे सर्व कामे जवळपास २३ कोटीची आहेत या सर्व कामाची तक्रार यापूर्वी विभागाकडे केल्यानंतर कुठलीही कारवाई न झाल्याने उच्च न्यायालय संभाजीनगर खंडपीठ मध्ये याबाबत जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे तसेच लोक आयुक्त कडेही यांनी निकृष्ट कामाचे व अनियमतेच्या कामाची तक्रार करण्यात आलेली आहे वरील सर्व निकृष्ट काम हे संबंधित विभागातील अधिकाऱ्यांशी लागेबांधे असल्याने करण्यात आलेली आहे तसेच स्थानिक पुढाऱ्यांचा वरदाहास्त असल्याने गेल्या अनेक वर्षापासून संबंधित अधिकारी याच ठिकाणी कार्यरत आहेत त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी मुख्य अभियंता यांच्याकडे संबंधित प्रभारी कार्यकारी अभियंता पानसंबळ यांची विभागा बाहेर बदली करून सदरील त्यांच्या काळातील सर्व कामातील अनियमितेची व भ्रष्टाचाराची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे

---

# चौसाळा येथे मराठा आरक्षण व संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या

## आंदोलनाला पांठीबा म्हणुन राष्ट्रीय महामार्गावर रस्तारोको आंदोलन-सतिष(भाऊ) जोगदंड



चौसाळा ।प्रतिनिधी

महाराष्ट्रातील मराठयांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देवून ओबीसीमधून आरक्षण देण्यात यावे व ईतर मागण्यासाठी संघर्षयोध्दा सरसेनापती मनोज दादा जरांगे पाटील हे अंबड तालुक्यातील अंतरवली सराटी येथे दि.२५/०१/२०२५ पासून अमरण उपोषणाला बसले आहेत .त्यांची प्रकृती खालावत चालल्यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये चिंता पसरली असुन महाराष्ट्र सरकारने त्यांच्या खालवलेल्या प्रकृतीची गांभीर्याने दखल घेऊन सर्व मागण्या मान्य कराव्या या साठी बीड तालुक्यातील बालाघाटावरील चौसाळा येथे दि.२९/०१/२०२५ वार बुधवार रोजी सोलापूर धुळे राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहीती चौसाळा येथिल सामाजिक कार्यकर्ते तथा मराठा सेवक सतिष (भाऊ)जोगदंड यांनी दिलेल्या निवेदनाद्वारे दिली आहे.

---

# मतदार संघामध्ये एक लक्ष भाजप सदस्य नोंदणी करावी आमदार सुरेश धस यांचे आवाहन

## जि.प.,पं.स. निवडणूकीतील विजयासाठी परिश्रमाचे दिले संकेत

आष्टी (प्रतिनिधी)

देवेंद्रजी फडणवीस साहेबांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांचा विजयाचा स्ट्राईक रेट हा ८९% एवढा आहे भारतीय जनता पार्टीचे विचार तळागाळात पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये एक लक्ष सदस्य नोंदणी करावी असे आवाहन करून आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुका या कार्यकर्त्यांच्या असून त्यांच्या विजयासाठी परिश्रमपूर्वक काम करून जीवाची रान करीन आणि कार्यकर्त्यांना निवडून आणि असा विश्वास आमदार सुरेश धस यांनी संवाद बैठकीमध्ये बोलताना व्यक्त केला आष्टी येथील भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या संवाद बैठकीमध्ये ते प्रमुख मार्गदर्शन करताना बोलत होते ते पुढे म्हणाले की विधानसभा निवडणुकीतील माझा विजय हा अपेक्षितच होता एक लक्ष मताधिक्याने विजयी झालो असतो परंतु पक्षात आणि महायुतीत माझा पराभव व्हावा या दुष्ट हेतूने बंडखोरी झाल्याने विजय ८० हजार मताधिक्यावर आला आता माझी निवडणूक संपली आहे यापुढे आता कार्यकर्त्यांची निवडणूक असल्यामुळे माझ्या इतकेच परिश्रम मी माझ्या कार्यकर्त्यांच्या निवडणुकीसाठी घेणार असल्यामुळे जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीचे सर्व सदस्य निवडून यावेत असा आपला प्रयत्न असून त्यासाठी भारतीय जनता पार्टीचे सदस्यता अभियान यशस्वी करून आष्टी विधानसभा मतदारसंघात किमान एक लाख भारतीय जनता पार्टीचे सभासदांची नोंदणी करावी असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आष्टी येथील कार्यकर्त्यांच्या संवाद बैठकीमध्ये प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला,बाबुराव केदार,शिरूर तालुकाध्यक्ष सुरेश उगलमुगले,पाटोदा तालुकाध्यक्ष भागवत येवले,महेंद्र गर्जे,भाऊसाहेब भवर,प्रकाश खेडकर,प्रकाश कवठेकर,नगराध्यक्ष जिया बेग,माऊली जरांगे,गणेश शिंदे,मिथून डोंगरे,प्रकाश देसरडा,कल्याण तांबे,डॉ.पांडुरंग चौधरी,केशव रसाळ,संजय नवले,सभापती किरण शिंदे,सभापती बद्रीनाथ जगताप, नगराध्यक्ष राजू जाधव,संदीप खकाळ, नगरसेवक अरुण भैय्या निकाळजे,रोहिदास गीते,संजय शिंदे,डॉ.सानप,बाळासाहेब घोडके,बाजीराव वाल्हेकर,दत्तात्रय जेवे,शिवाजी पवार,,बबन तरटे,अनिल ढोबळे,सौ.प्रतिभा थोरवे,बाबु गर्जे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की, विधानसभा निवडणुकीमध्ये देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड यश मिळाले बीड जिल्ह्यामध्ये मी पाच टर्म विजयी झालेला आमदार असल्यामुळे मंत्री पद मिळेल असे वाटत होते परंतु नाही मिळाले तरी मी नाराज कधीच नव्हतो मी सतत कामात आहे मंत्री पदा पेक्षा हिवाळी अधिवेशन नागपुर येथे पहिल्याच अधिवेशनातील स्व.संतोष देशमुख यांची झालेली निर्घृण हत्या आणि त्यावर मी विधानसभेत केलेले विस्तृत भाषण या मुळे सबंध महाराष्ट्रात मला प्रसिध्दी मिळाली.शेवटी आपण आपल्याला मिळालेली जबाबदारी कशा पद्धतीने मांडतो याला जास्त महत्त्व आहे.माझ्या आयुष्यात दोन व्यक्तींनी मला सल्ले दिलेत आणि



मी त्यांचे पालन करतो त्या पैकी एक म्हणजे स्व.प्रमोदजी महाजन ते आष्टी येथे १९९९ साली जेव्हा प्रचाराला आले होते तेव्हा ते म्हणाले होते की,सुरेश देव करतो ते भल्यासाठीच हे नेहमी लक्षात ठेव आणि दुसरं म्हणजे स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेब ते देखील म्हणायचे सुरेश कधीपण एका कानाने ऐकायचे आणि दुसऱ्या कानाने सोडून द्यायचे.त्यांचा प्रभाव माझ्या राजकीय जीवनावर नेहमी राहिला असल्याने स्व.आर आर पाटील,स्व.विलासराव देशमुख आणि सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भाषणे पहा अत्यंत मुद्देसूद,विषयावर पकड यासह आदी विषय हाताळण्याची सचोटी या व्यक्तींकडे आहे.आष्टी मतदार संघातील जनतेने मला भरघोस मतांनी निवडून दिलंय त्यांचे उपकार कधीच मी फेडू शकणार नाही.परंतु मतदार संघाचा लोकप्रतिनिधी म्हणून माझ्या मतदार संघातील एकाही कार्यकर्त्याची मान शरमेने खाली जाईल असे कृत्य माझ्याकडून कधीही होणार नाही आता माझी निवडणूक झाली इथून पुढच्या जिल्हा परिषद,पंचायत समिती आदी निवडणुका या कार्यकर्त्यांच्या आहेत.मी तुम्हाला शब्द देतो जस तुम्ही माझ्यासाठी प्रामाणिक काम केले.त्यांच्यासाठी मी दिवसरात्र एक करीन आणि तुमच्या सोबत राहील असे उपस्थित कार्यकर्त्यांना आश्वासन दिले. सरल पला जसा भरभरून प्रतिसाद सर्वांनी दिला तशाच प्रकारे आता आगामी ३१ तारखेपर्यंत आष्टी मतदार संघातून किमान १ लाखाहून अधिक भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांनी नोंदणी करणे गरजेचे असल्याचेही आ.धस म्हणाले.निवडणुकीत दिलेल्या आश्वासनापैकी जरेवाडी पॅटर्न आता सुरू केलेला आहे. २ फेब्रुवारी रोजी माझा वाढदिवस असतो परंतु त्यादिवशी मी माझा वाढदिवस स्वीकारणार नसून पाच तारखेला पुस्तक रूपात शुभेच्छा स्वीकारणार आहे ५ जानेवारी रोजी मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांच्या उपस्थितीत खुंटेफळ साठवण तलावाचे पाईपलाईन कामाचा शुभारंभ आणि श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथील मंदिराच्या गाभाऱ्याचा भूमिपूजन समारंभ होणार आहे उद्घाटन होणार आहे या कार्यक्रमास मतदारसंघातील जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले आणि भविष्यात खुंटेफळ साठवण तलावासाठी आणखी चार टीएमसी पाणी मिळाल्यास

मातकुळी तलावापर्यंत हे पाणी आपणास मिळणार आहे तसेच गोदावरी खोऱ्यात ५४ टीएमसी पाणी येणार आहे त्यापैकी साडेतीन टीएमसी पाणी आष्टी आणि पाटोदा येथील शेती सिंचनासाठी आपण उपलब्ध करणार आहोत भविष्यात जायकवाडीतून पाटोदा आणि शिरूर या तालुक्याला पाणी आणण्याचे काम करायचे असून मतदार संघ आगामी काळात संपूर्णपणे जलमय करणार असल्याचेही आ.धस म्हणाले. मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा आपण मागितलेला नाही परंतु त्यांनी पालकमंत्री पद भाड्याने दिलेल्या मुळे जिल्ह्यात अनेक चुकीच्या घटना घडलेल्या आहेत माझ्यावर जातीवादाचा आरोप चुकीचा असल्याचे सांगत ते म्हणाले की मी केवळ संतोष देशमुख यांच्या खुना बद्दल बोलत नाही तर परळीत झालेल्या महादेव मुंडे यांच्या कोणाचे आरोपी अद्यापही सापडत नाहीत हे अत्यंत वाईट आहे त्यामुळे जात पात याच्यापलीकडे आपले राजकारण

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT